# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 July 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०२ जूलै २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- नागरिकांचे आकस्मिक मृत्यू आणि कोविड लसीकरणाचा परस्पर संबंध नसल्याचं केंद्र सरकारकडून स्पष्ट
- खासगी वापराची नोंदणी असलेल्या दुचाकींना बाईक टॅक्सी सेवा देण्यास केंद्राची परवानगी
- एकशे पन्नास दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिस अनुकंपा भरती प्रकरणं मिशन मोडवर निकाली काढणार–मुख्यमंत्र्यांची घोषणा
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात महिला कीर्तनकार हत्या प्रकरणी दोन परप्रांतीय आरोपींना अटक

आणि

- नांदेड जिल्ह्यात कृषी विभागाच्या तपासणी मोहिमेत २८ कृषी केंद्रांवर कारवाई

****

नागरिकांचे आकस्मिक मृत्यू आणि कोविड लसीकरणाचा परस्पर संबंध नसल्याचं, केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे. भारतीय आयुर्विज्ञान संशोधन संस्था तसंच राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने केलेल्या सखोल अभ्यासातून ही बाब स्पष्ट झाल्याचं, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे. भारतात तयार झालेली कोविड लस ही सुरक्षित असल्याचं सांगत, अशा आकस्मिक मृत्यूंमागे अनुवांशिकता, जीवनशैली आणि आधीच असलेले आजार, अशी कारणं असल्याचं या संस्थांच्या निष्कर्षात नमूद केलं आहे.

****

केंद्र सरकारनं, खासगी वापरासाठीची नोंदणी असलेल्या दुचाकींना राईड–हेलिंग ॲग्रीगेटर प्लॅटफॉर्मवर बाईक टॅक्सी सेवा देण्याची परवानगी दिली आहे. यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं 'मोटार वाहन ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५' अधिसूचित केली आहे. मात्र या सेवेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संबंधित राज्य सरकारांची मान्यता आवश्यक राहणार आहे. या निर्णयामुळे शहरी आणि ग्रामीण भागातल्या नागरिकांसाठी स्वस्त आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार असून, रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अशी सरकारची अपेक्षा आहे.

****

राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदर्भातली सर्व प्रकरणं मिशन मोडवर निकाली काढली जाणार असून, अनुकंपा भरतीसंदर्भात सर्व विभागांना आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली. विधान परिषद सदस्य सुनील शिंदे यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या अवस्थेबाबतचा मुद्दा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला, यावर उत्तर देताना, पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणात चांगल्या दर्जाची घरं बांधल्याचं आणि हे काम आणखी वाढवण्यासाठी मुंबईत योजना तयार केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

****

अंमली पदार्थांच्या तस्करांवर 'मकोका' अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून यासंदर्भातलं विधेयक या अधिवेशनात आणून त्यानुसार कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज विधान परिषदेत केली. आमदार परिणय फुके यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. अशा गुन्हेगारांविरुद्धचे खटले जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी आवश्यक पावलं सरकार उचलत असून व्यसनमुक्ती केंद्रं उभारण्याचं कामही सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या शाळांमध्ये पटसंख्या कमी असली तरी त्या शाळा बंद केलेल्या नाहीत, आणि यापुढेही बंद होणार नाहीत, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधान परिषदेत दिली. आमदार विक्रम काळे यांच्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. राज्यातल्या १८ हजारांहून जास्त शाळांची पटसंख्या २० पेक्षा कमी आहे, मात्र यापैकी कोणतीही शाळा बंद झालेली नाही, असं त्यांनी सांगितलं. कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये अतिरिक्त असलेल्या शिक्षकांना इतर शाळांमध्ये समयोजित केलं जात असल्याचंही भोयर यांनी नमूद केलं. संख्या वाढूनही शिक्षक नसलेल्या शाळांमध्ये संचमान्यतेच्या नियमानुसार शिक्षकांची नियुक्ती केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. राज्यातल्या जवळपास एक हजार शाळा शून्य शिक्षकी झाल्या असून त्यांतल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न महत्त्वाचा असल्याचा मुद्दा आमदार सुधाकर आडबाले यांनी उपस्थित केला. यावर, माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल, असं मंत्री भोयर यांनी सांगितलं. आमदार अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे, संजय खोडके, इद्रिस नायकवडी आणि इतरांनी चर्चेत भाग घेतला.

****

राज्यात वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी किंवा शेतमजुरांच्या कुटुंबियांना दिली जाणारी चार लाख रुपयांची मदत वाढवून ती दहा लाख रुपये करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात केली. याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचं आश्वासन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिलं, ते म्हणाले –

**बाईट – गिरीश महाजन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

****

पंढरपूरच्या आषाढी वारीत काही नास्तिक, शहरी नक्षल संघटनांनी शिरकाव केल्याचा आणि वारकऱ्यांचा बुद्धिभेद करायचा प्रयत्न होत असल्याचा दावा आमदार मनीषा कायंदे यांनी विधान परिषदेत विशेष उल्लेखाद्वारे केला. याबाबत चौकशीचे आदेश संबंधित विभागाला दिल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

****

बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना बंधनकारक करण्यात येणार आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात ही माहिती दिली. शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे गुन्हे कमी करण्यासाठी 'कृषी गुन्हे शाखा' आणि कृषी न्यायालय स्थापन करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचंही रावल यांनी सांगितलं.

****

परभणी जिल्ह्यात बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातल्या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी पाथरीचे आमदार राजेश विटेकर यांनी केली आहे. ते आज विधानसभेत बोलत होते. पात्र परंतु वंचित नागरिकांना महामंडळाचा लाभ मिळवून देण्यासाठी गावोगावी शिबीरं घेण्याची मागणीही विटेकर यांनी केली.

****

आमदार बबनराव लोणीकर यांच्या कथित वक्तव्यासंदर्भात विरोधकांनी केलेल्या आरोपांना लोणीकर यांनी आज विधानसभेत उत्तर दिलं, या उत्तरावरून विरोधक आणि सत्ताधारी सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यावरून झालेल्या गदारोळामुळे सदनाचं कामकाज दहा मिनिटं तहकूब करावं लागलं.

दरम्यान, गडचिरोली खनिकर्म प्राधिकरण, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, ही विधेयकं विधान सभेने संमत केली, तर विधान सभेनं काल संमत केलेलं नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी विधेयक आज विधान परिषदेनं संमत केलं.

****

महाविद्यालयाच्या तपासणीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समित्या रवाना झाल्या आहेत. विद्यापीठाशी संलग्नित पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या जालना, बीड, धाराशिव जिल्ह्यातल्या महाविद्यालयातल्या सुविधांची या समित्या तपासणी करणार आहेत. पुढच्या काही दिवसांत या तपासणीचे अहवाल प्राप्त होतील, त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पदव्युत्तर महाविद्यालयांची तपासणी सुरू होईल, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे यांनी दिली.

****

महिला कीर्तनकार संगीता महाराज हत्या प्रकरणी दोन परप्रांतीय आरोपींना अटक करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या वैजापूर तालुक्यात चिंचडगाव इथं गेल्या आठवड्यात ही हत्या झाली होती. या प्रकरणी एका आरोपीला मध्यप्रदेशातून, तर दुसऱ्याला वैजापूर इथंच अटक करण्यात आली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात कृषी विभागानं सुरू केलेल्या कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीत, अनेक केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळल्यानं एकूण २८ कृषी केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय, विक्री परवानगी घेतलेली असतानाही दुकानं बंद ठेवणाऱ्या केंद्रांचीही विशेष नोंद घेण्यात आली आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि नियमानुसार सेवा मिळाव्यात यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून, नियमभंग करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जाणार आहे, असं जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी सांगितलं आहे.

****

खामनदी पुनरुज्जीवन अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अंकीत यांनी बुधवारी पाटोदा, नायगाव तसंच वळदगाव इथं भेटी दिल्या. या वेळी अंकीत यांनी स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, घरोघरी कचरा संकलन, वर्गीकरण, शास्त्रौक्त विल्हेवाट, मुलभूत सुविधांची पाहणी करुन समाधान व्यक्त केलं. गावातील शाळांना देखील अंकीत यांनी भेट दिली.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या वित्त विभागातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या २०२४-२५ च्या भविष्य निर्वाह निधी विवरणपत्रांचं संगणकीकरण करण्यात आलं असून, या नव्या सुविधा प्रणालीचं लोकार्पण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या हस्ते आज करण्यात आलं. झेड पी एन जी पीएफ डॉट इन, या संकेतस्थळावर शिक्षक कर्मचाऱ्यांना आपली जीपीएफ विवरणपत्रं उपलब्ध होणार आहेत.

****

भारत आणि इंग्लंडदरम्यान पाच क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहम इथं सुरू आहे. यजमान संघानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली.

****